# डॉ. व्ही. टी. पाटील यांचा स्मृतिदिन

टेंबलाईवाडी, ता. १९ : ताराराणी विद्यापीठ व मौनी विद्यापीठ, गारगोटीचे संस्थापक अध्यक्ष कै. डॉ. व्ही. टी. पाटील यांचा २५ वा स्मृतिदिन व ताराराणी आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण समारंभ झाला. यावेळी डॉ. सुभाष देसाई यांचे 'डॉ. व्ही. टी. पाटील व्यक्ती आणि कार्य' या विषयावर व्याख्यान झाले.

अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष डॉ. क्रांतिकुमार पाटील होते. शाहीर आझार नायकवडी यांनी शाहिरी सादर केली.

ताराराणी आदर्श शिक्षक पुरस्कार कमला महाविद्यालयाच्या अर्थशास्त्र विभागाच्या डॉ. अनघा पाठक यांना दिला. यावेळी सचिव प्राजक्ता पाटील, संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. एस. एन. पवार, डॉ. अशोक पर्वते, प्राचार्य सी. आर. गोडसे उपस्थित होते. पी. आर. मंडलिक यांनी सूत्रसंचालन केले.

सकाळ -
20 जाने 2020

Scanned by CamScanner